संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com

एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स



डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

उपलब्ध सुविधा

डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : १२८ ● ● शुक्रवार दि. २९ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# सांगलीत रेकॉर्डवरील गुन्हेगाराला अटक

## सात लाखाचे दागिने जप्त ;सराफ अटकेत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : सांगली शहरातील विविध ठिकाणचे बंद असलेली घरे फोडून त्यातील ऐवज चोरणाऱ्यास रेकॉर्डवरील गुन्हेगाराला अटक करण्यात आली. तसेच चोरट्याकडून दागिने खरेदी करणाऱ्या सराफालाही अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आणून साडेसात लाखांचे दागिने जप्त करण्यात आल्याची माहिती निरीक्षक सतीश शिंदे यांनी दिली.



**सांगली : चोरट्याकडून जप्त करण्यात आलेले दागिने, दागिने विकत घेणार सराफ व तपास करणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी**

सुनील नामदेव रूपनर (वय ३२, रा.कुपवाड ) सुशील संजय आपटे (वय २४, रा. गारपीर चौक, सांगली)अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. जिल्ह्यातील घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी निरीक्षक शिंदे यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांचे एक विशेष पथक तयार केले आहे. पथक सांगली शहरात गस्त घालत होते. त्यावेळी पथकातील बिरोबा नरळे यांना रेकॉर्डवरील गहेगार सुनील रूपनर हा सांगली रेल्वे स्टेशनच्या पूर्वेस असणाऱ्या एका अपार्टमेंटजवळ चोरीचे दागिने विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती खबऱ्याद्वारे मिळाली.

त्यानंतर पथकाने त्या परिसरात सापळा रचला होता. मिळालेल्या माहितीनुसार सुनील रूपनर हा एका अपार्टमेंटसमोर थांबला होता. त्याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने पथकाने त्याला ताब्यात घेतले. त्याची झडती घेतल्यानंतर त्याच्या कमरेला एक हातोडी तसेच खिशात दागिने सापडले. त्याबाबत त्याच्याकडे कसून चौकशी केल्यानंतर त्याने शहरातील अभयनगर, बालाजीनगर, होळकर चौक, विष्णुघाट आदी परिसरातील बंद असलेली घरे फोडून दागिने चोरल्याची कबुली दिली. तसेच ते दागिने सराफ सुशील आपटे याला विकल्याचे सांगितले. रुपनर हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असल्याचे माहित असूनही त्याच्याकडून चोरीचे दागिने खरेदी आपटे यालाही अटक करण्यात आली. त्याच्याकडून साडेसात लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोघांनाही संजयनगर पोलिसांच्या ताब्यात आले आहे.

एलसीबीचे पोलिस निरीक्षक सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक पंकज पवार, उपनिरीक्षक कुमार पाटील, बिरोबा नरळे, संदीप गुरव, संदीप नलवडे, उदयसिंह माळी, सागर लवटे, अमर नरळे, कॅप्टन गुंडवाडे आदींच्या पथकाने ही कारवाई केली.

# देविखिंडीचा ऐतिहासिक निर्णय

## गावठाण मिळकतीला पतीपत्नीचे संयुक्त नाव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

विटा : देविखिंडी (ता.खानापूर) ग्रामपंचायतीने गावठाण मालमत्ता पती-पत्नीच्या संयुक्त नावे करण्याचा निर्णय घेऊन या निर्णयाची अंमलबजावणी केली. तसा ठराव करून पती-पत्नीचे संयुक्त नाव ग्रामपंचायतीच्या आठ-अ उतार्यावर लावणारी जिल्ह्यातील पहिलीच ग्रामपंचायत ठरली आहे.

देविखिंडी (ता. खानापूर) या गावचा उंबरा १ हजार २१४ असून डोंगरी प्रवर्गातील या गावाची लोकसंख्या २ हजार २१२ आहे. गावात महिलांची संख्या १ हजार १६९ असून एकूण लोकसंख्येच्या तुलनेत महिलांची टक्केवारी ५३ टक्के आहे. महिलांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण होण्यासाठी त्यांना पतीच्या मालमत्तेमध्ये समान हक्क देणे ही मुलभूत गरज आहे. त्यामुळे स्त्रियांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी त्यांच्या असलेल्या घरांची नोंद पती- पत्नी या दोघांच्या नावे असणे आवश्यक असल्याचे मत देविखिंडीतील अनेकांनी व्यक्त केले. याची दखल घेत तत्कालीन सरपंच रुक्मिणी निकम, उपसरपंच प्रकाश निकम, ग्रामसेवक सोमनाथ सपाटे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्यांनी मासिक सभेत पहिल्यांदा हा ठराव मंजूर केला. या ठरावाला ग्रामसभेनेही एकमताने मंजूर दिली. हरकतीसाठी मुदतही देण्यात आली. मात्र, या निर्णयाला कोणीही हरकत घेतली नाही.

# सांगलीतील प्रसिद्ध रघुवीर स्वीटस दुकानाला लागली आग

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : शहरातील प्रसिद्ध असलेले विश्रामबाग येथील रघुवीर स्वीटस या मिठाईच्या दुकानाला गरवारी गुरुवार रात्री सातच्या सुमारास अचानक आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच तेथील कामगारांनी गॅस सिलेंडर सह अन्य साहित्य तातडीने बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला. या आगीत लाखो रूपयांचे नुकसान झाले असून जीवित हानी झाली नसल्याचे अग्नीशमन विभागाकडून सांगण्यात आले.





**सांगली : येथील प्रसिद्ध रघुवीर स्वीटस या मिठाईच्या दुकानाला आग लागून यामध्ये यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले.**

शहरातील विश्रामबाग येथे रघुवीर स्वीटस हे अल्पावधीतच नावारूपाला आलेले मिठाईचे दुकान आहे. गुरुवारी रात्री सातच्या सुमारास दुकानाच्या किचनमध्ये अचानक शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागली. घटना लक्षात येताच तेथील कामगारांनी गॅसने भरलेली सिलिंडर तसेच अन्य साहित्य तातडीने बाहेर हलवले. शिवाय याची माहिती महापालिकेच्या अग्नीशमनदलाला देण्यात आली. अग्नीशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. एक तासाच्या अथक प्रयत्नानंतर आग आटोक्यात आणण्यात यश आले. यामध्ये कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी दुकानातील साहित्य जळून खाक झाल्याने लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.

# जमिनीच्या वादातून एकाचा खून

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कऱ्हाड : जमिनीच्या वादातून धारदार शस्त्राने वार करून एकाचा खून करण्यात आला. तर हल्ल्यात दोघे गंभीर जखमी झाले. म्होप्रे, ता. कऱ्हाड येथे बुधवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. याप्रकरणी तिघांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया कऱ्हाड ग्रामीण पोलीस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत सुरू होती.

प्रकाश बाबुराव सकपाळ-पाटील (वय ६०) असे खून झालेल्याचे नाव आहे. तर किशोर सकपाळ-पाटील, किरण सकपाळ-पाटील हे दोघे जखमी झाले आहेत. रणजीत जाधव (रा. गोळेश्वर), अनिल सकपाळ, सुनील सकपाळ अशी संशयीतांची नावे आहेत.

घटनास्थळावरून मिळालेल्या तसेच पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, म्होप्रे येथील प्रकाश सकपाळ-पाटील आणि अनिल सकपाळ यांच्यात जमिनीचा वाद होता. बुधवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास प्रकाश सकपाळ-पाटील हे म्होप्रे येथील बसथांब्यानजीक असताना संशयित तिघे त्याठिकाणी आले. त्यांनी प्रकाश सकपाळ-पाटील यांच्याशी जमिनीच्या कारणावरून वाद घातला. या वादातूनच त्यांच्यात धक्काबुक्की झाली. त्यावेळी संशयतांनी त्यांच्याकडील धारदार शस्त्राने प्रकाश यांना भोकसले. तसेच त्याठिकाणी असलेल्या किशोर व किरण सकपाळ-पाटील या दोघांवरही शस्त्राने वार करण्यात आले.

घटनेची माहिती कऱ्हाड ग्रामीण पोलीस ठाण्यात देण्यात आली. रात्री पोलीस त्याठिकाणी पोहोचले. त्यांनी मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठवून दिला.

# आता थेट पोस्टातून मिळणार अस्सल सेंद्रिय देवगड हापूस आंबा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : बाजारातील आंब्याच्या अस्सलतेची शंका नेहमीच ग्राहकांकडून उपस्थित होत असते. सांशकतेच्या धुक्यातून ग्राहकांना बाजूला करीत आता पोस्ट विभागाने उत्पादक ते ग्राहक अशी सेवा सुरू केली आहे. देवगडचा अस्सल अन् तोही सेंद्रिय पद्धतीने पिकविलेला हापूस आंबा पोस्टातून मिळणार आहे. भारतीय टपाल विभागामार्फत अनेक ग्राहक उपयोगी योजना सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून थेट उत्पादकांना ग्राहकाशी जोडण्यासाठी पोस्टाने पाऊल उचलले आहे. शेतकऱ्याचा माल ग्राहकापर्यंत पोहचवून त्याच्या मालास योग्य ते मूल्य व बाजारपेठ मिळवून देण्यात येत आहे. देवगड हापूस आंबा आता सांगली शहरातील निवडक टपाल कार्यालयात उपलब्ध करून देण्यात येत आहे.कोकणातील दहिबाव (ता. देवगड) येथील फळ उत्पादक श्रीधर ओगले यांच्याशी पोस्टाने नुकताच करार केलेला आहे. ओगले हे आंबा व्यवसायात १८ वर्षे कार्यरत आहेत. तसेच ते सिंधुदुर्ग जिल्हा फळ प्रक्रिया उत्पादक संघाचे अध्यक्ष आहेत.

# शिक्षण दहावी पास, मात्र उभारले एमडी ड्रग्जचे २५० कोटींचे साम्राज्य

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई : मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने सांगली येथील एमडी निर्मितीचा कारखाना उद्धवस्त करत कुर्ला, सांगली, सुरत या ठिकाणी कारवाई करत १० जणांना बेड्या ठोकल्या आहे. या कारवाईत पोलिसांनी २५२ कोटी रुपयांचा १२६ किलो एमडीसाठा जप्त केला आहे. टोळीचा म्होरक्या प्रवीण ऊर्फ नागेश रामचंद्र शिंदे (३४) केवळ दहावी पास असून त्याने उत्तर प्रदेशमध्ये चार वर्षे एमडी बनविण्याचे प्रशिक्षण घेऊन सांगलीत ड्रग्ज बनविण्याचा कारखाना थाटल्याचे गुन्हे शाखेच्या तपासात समोर आले आहे.

कुर्ला येथे गुन्हे शाखेच्या कक्ष ७ च्या पथकाने वरिष्ठ निरीक्षक महेश तावडे यांच्या नेतृत्वाखाली परवीन बानो शेख (३३) या महिलेला ६४१ ग्रॅम एमडीसह अटक केली. १६ फेब्रुवारीला करण्यात आलेल्या कारवाईत १२ लाख २० हजार व २५ ग्रॅम सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले. पोलिस निरीक्षक आत्माजी सावंत यांनी तिची चौकशी केली असता मीरारोड येथील व्यक्तीकडून हे एमडी घेतल्याचे तिने सांगितले. त्यानुसार पोलिसांनी मीरारोड येथील एमडी विक्रेता साजीद शेख ऊर्फ डेबस (२५) याला उचलले.

त्याच्याकडून सहा कोटी किमतीचा तीन किलो एमडी व तीन लाख ६८ हजार रुपयांची रोकड असा मुद्देमाल मिळून आला. त्याच्या चौकशीत तो सुरत येथील दोघांना एमडी विकत असल्याचे समोर आले. मग त्यानुसार निरीक्षक शिंदे, उबाळे, सपोनि अमोल माळी, उपनिरीक्षक स्वप्निल काळे, रामदास कदम, शेलार व पथकाने सुरतेला जाऊन इजाजअली अन्सारी (२४) आणि आदिल बोहरा (२२) या दोघांना अटक केली.

आरोपींच्या चौकशीत ते सांगलीतून हा एमडी घेत असल्याचे समोर येताच, उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सांगलीतले इरळे गाव गाठून द्राक्षाच्या शेताच्या आड लपून गुपचूप सुरू असलेला एमडीचा कारखाना उद्ध्वस्त केला.


त्याठिकाणी १२२ किलो ५०० ग्रॅम वजनाचा एमडी, एमडी बनविण्यासाठी लागणारे साहित्य जप्त करून सहा जणांना अटक केली. सांगलीतून पोलिसांनी प्रवीण शिंदे (३४), वासुदेव जाधव (३४), प्रसाद मोहिते (२४), विकास मलमे (२५), अविनाश माळी (२८) आणि लक्ष्मण शिंदे (३५) अशा सहा जणांना अटक करण्यात आली आहे.

टोळीचा म्होरक्या प्रवीण हा मूळचा सांगलीचा रहिवासी असून परिवारासह मीररोड येथे स्थायिक झाला होता. दहावीपर्यंत शिकलेल्या प्रवीणने चार वर्षांपूर्वी उत्तर प्रदेशात जाऊन एमडी बनविण्याचे प्रशिक्षण घेतले. प्रवीणला प्रत्येक किलो मागे एक लाख रुपये मिळत होते.

# रेठरे धरण येथील युवकाची बिबट्याच्या तावडीतून सुटका

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

रेठरे धरण : जबड्यात कुत्र्याची शिकार व नजरेत हल्ला करण्याच्या तयारी या आवेशात असलेल्या बिबट्याचा थरार येथील विजय बाजीराव पाटील या युवकाने अनुभवला. घटनास्थळी डंपर आल्याने बिबट्याच्या तावडीतून त्याची सही सलामत सुटका झाली. 'काळ आला होता, पण वेळ आली' नव्हती, अशी थरारक घटना रेठरे धरण येथे सोमवारी पहाटे तीनच्या सुमारास घडली. परंतु, दोन दिवसानंतर हा प्रकार उजेडात आला.



रेठरे धरण तलावाच्या पूर्वेस माळरानावर शेतातील कामासाठी मशीन सुरू होती. त्यामुळे विजय पाटील हा युवक एकटाच तिथे झोपला होता. पहाटे तीन वाजता पावलांचा आवाज आल्याने त्याच्या दिशेने विजय याने बॅटरी दाखविली. यावेळी बिबट्याच्या तोंडात कुत्र्याची शिकार दिसली. पण बिबट्या युवकाच्या दिशेने येऊ लागला. त्यावेळी त्याने आरडाओरडा केला, परंतु जवळ कोणीच नव्हते, विजय देखील पुढे बिबट्याकडे पाहत पाठीमागे चालत असताना त्याच्या पायाला दगड लागून पाय रक्तबंबाळ झालेला त्याचवेळी जबड्यातील कुत्र्याला खाली टाकून देत, बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केला. सुमारे अर्धा तास हा थरार सुरू होता.

त्यावेळी तेथे एक डंपर आला व त्याच्या उजेडात चालकाला बिबट्या व समोर युवक असल्याचे दिसल्यावर त्याने घाबरलेल्या विजयला डंपरच्या केबिनमध्ये घेतल्याने त्याची बिबट्याच्या तावडीतून सुटका झाली.

# कोल्हापुरात शाहू महाराजांविरुद्ध मंडलीक हातकणंगलेतून मानेंना उमेदवारी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई - महायुतीतील जागावाटप अंतिम निर्णय झाल्यानतंर अखेर शिवसेना शिंदे गटाच्या ८ उमेदवारांची नावे जाहीर झाली आहेत. त्यामुळे, बऱ्यापैकी लोकसभा उमेदवारांच्या लढतींचं चित्र स्पष्ट झालं आहे. पश्चिम महाराष्ट्रात लक्ष लागलेल्या कोल्हापूर आणि हातकणंगले मतदारसंघातील दोन्ही विद्यमान खासदारांना शिदेंनी तिकीट दिलं आहे. त्यामुळे, कोल्हापुरात छत्रपती शाहू महाराज यांच्याविरुद्ध संजय मंडलीक असा सामना रंगणार आहे. यापूर्वी महाविकास आघाडीकडून काँग्रेसने शाहू महाराजांना उमेदवारी जाहीर केली होती.

महाविकास आघाडीकडून काँग्रेसने जाहीर केलेल्या पहिल्याच यादीत कोल्हापूर घराण्याच्या गादीचे वारस छत्रपती शाहू महाराजांना उमेदवारी देण्यात आली आहे. शरद पवार यांच्यासह महाविकास आघाडीतील इतरही नेत्यांनी शाहू महाराजांना उमेदवारीसाठी आग्रह केला होता. त्यानंतर, शाहू छत्रपतींनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला. तर, काँग्रेसने त्यांची उमेदवारी जाहीर केल्यानंतर शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनीही त्यांची कोल्हापुरात जाऊन भेट घेतली होती. त्यामुळे, कोल्हापुरात शाह महाराजांविरुद्ध उमेदवार कोण, याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. त्यातच, विद्यमान खासदार संजय मंडलीक यांना तिकीट मिळणार, की शिवसेनेकडून दुसरा उमेदवार देण्यात येणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अखेर



शिवसेनेकडून ८ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेकडून कोल्हापूर जिल्ह्यातील दोन्ही उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये, कोल्हापूरसाठी संजय मंडलीक तर हातकणंगलेसाठी धैर्यशील मानेंना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. शिवसेनेच्या दोन्ही विद्यमान खासदारांना पक्षाने पुन्हा एकदा मैदानात उतरवले आहे. मात्र, कोल्हापूरमध्ये यंदा शाहू महाराज विरुद्ध सदाशिव मंडलीक असा सामना पाहायला मिळणार आहे. तर, हातकणंगलेमधून धैर्यशील मानेंच्या विरोधात कोण, असा प्रश्न अद्यापही कायम आहे. कारण, महाविकास आघाडीने अद्यापही हातकणंगलेसाठी उमेदवार जाहीर केलेला नाही. मात्र, या जागेसाठी राजू शेट्टींना महाविकास आघाडीकडून पुरस्कृत उमेदवार म्हणून जाहीर केले जाऊ शकते. त्यामुळे, येथे यंदाही धैर्यशील माने विरुद्ध राजू शेट्टी असा सामना रंगणार आहे.

# महायुतीमध्ये आम्ही नाराज, दोन-तीन दिवसांत पुढील भूमिका घेण्यात येईल - रामदास आठवले

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : महायुतीच्या जागावाटपात रिपब्लिकन पक्षाकडे दुर्लक्ष केलं जात आहे. युतीत आम्हाला विश्वासात घेतलं जात नाही. लोकसभेच्या दोन जागा आम्ही मागितल्या आहेत, मात्र साधे चर्चेलाही बोलाविले जात नाही. त्यामुळे महायुतीमध्ये आम्ही नाराज आहोत. पुढील दोन-तीन दिवसांत पुढील भूमिका घेण्यात येईल असा इशारा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिला.

रिपाइं (आठवले गट) पक्षाची राज्य कार्यकारिणीची बैठक पुण्यात गुरुवारी झाली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. रामदास आठवले म्हणाले, आम्हाला लोकसभेच्या दोन जागा पाहिजेत. शिर्डी लोकसभेची जागा मिळाली तर मी उत्सुक आहे. सोलापूरच्या जागेसाठी आम्ही आग्रही होतो. त्याठिकाणी आमचा उमेदवार तयार होता. मात्र, भाजपने उमेदवार जाहीर केला. मला महाविकास आघाडीची ऑफर होती, पण मी नाकारली. सध्याची महायुती आरपीआयच्या पाठिंब्यामुळे झाली असून रिप्लब्लिकन पक्षाकडे लक्ष दिलं जात नसल्याची भावना



कार्यकर्त्यांमध्ये आहे. केंद्रात आणि राज्यात एक मंत्रीपद मिळेल असं आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं होतं. मात्र त्यांनी हे आश्वासन पूर्ण केलं नाही. महायुतीमध्ये असूनही आम्हाला राज्यात मंत्रिपद देण्यात आलेले नाही.आम्हाला सन्मान मिळावा ही अपेक्षा आहे. राज्य सरकारच्या शासकीय कार्यक्रमात माझा फोटो कुठेही लावला जात नाही. आमची मते मिळवायची असतील तर फोटो छापला जातो. फोटो नसल्यामुळे कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

आमच्या कार्यकर्त्यांना कुठेही विश्वासात घेतले जात नाही. आंध्र, तामिळनाडू, आसाम या ठिकाणी आम्ही स्वतंत्र लढत आहोत. आम्ही ज्यांच्या सोबत जातो, ते सत्तेत येतात. मी केंद्रात मंत्री असल्याने आमचा पक्ष देशभरात वाढला आहे. नागालँडमध्ये आमचे दोन आमदार निवडून आले आहेत. बैठकीत आमच्या पक्षाला दोन महामंडळ, एक विधानपरिषद सदस्य, विधानसभा निवडणुकीत ४० जागा आणि लोकसभेला दोन जागा आम्हाला हव्या आहेत. तसेच रिपब्लिकन पक्षाचा अपमान होत असेल तर वेगळा मार्ग धरावा अशी कार्यकर्त्यांची मागणी आहे. प्रकाश आंबेडकर बी टीम असतील तर आमची ए टीम आहे.संविधान बदलण्याचा प्रयत्न केल्यास मंत्रिपद सोडल्याशिवाय राहणार नाही. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी याबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. नवे कायदे केले, म्हणजे संविधान बदलणे होत नाही, असेही आठवले यांनी सांगितले.

## * संपादकीय *

# पांगुळगाडा पुरे!

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत इस्रायल-हमास यांच्यातील युद्धात शस्त्रसंधीची मागणी करणारा ठराव अखेर एकमुखाने मंजूर झाला. यात 'अखेर' असे म्हणायचे कारण याआधी किमान तीन वेळा अशा ठरावांवर अमेरिकेने आपला नकाराधिकाराचा खोडा घालून ते पराभूत केले. या वेळी अमेरिकेने या ठरावावर मतदान केले नाही. ती तटस्थ राहिली. त्यामुळे शस्त्रसंधीची मागणी १४ विरुद्ध शून्य अशा मतांनी मंजूर झाली. याचा फार मोठा धक्का इस्रायलला नक्कीच बसला. आपण काहीही करावे आणि अमेरिकेने आंतरराष्ट्रीय मंचावर आपली पाठराखण करत राहावे याची इतकी चटक इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांना लागलेली आहे की त्यांना कोणी अडवणारा राहिलेला नाही. याचा परिणाम नेतान्याहू सोकावण्यात झाला. आधीच हा गृहस्थ कमालीचा बेमुर्वतखोर, आढयताखोर आणि त्यात भ्रष्ट. या अशा नेत्याचे भूत आणि वर्तमान लक्षात घेता अमेरिकेने ही ब्याद सांभाळण्याची जबाबदारी स्वत:च्या शिरावर घेण्याची काहीही गरज नव्हती. इस्रायलच्या जन्मापासून अमेरिका ही त्या देशाची राखणकर्ती राहिलेली आहे. मग ते पंतप्रधान गोल्डा मायर यांच्या काळात अरब देशांनी इस्रायलवर संयुक्तपणे केलेला हल्ला असो वा योम किप्पुर किंवा आताचे हमासविरोधातील युद्ध असो. अमेरिकेकडून इस्रायलची होणारी आंधळी पाठराखण अजिबात लपून राहिलेली नाही. यामागे अमेरिकेचे यहुद्यांबाबतचे प्रेम उतू जाते, असे अजिबात नाही. पण तरीही अमेरिका सतत इस्रायलचे सारे अपराध पोटात घेते. याचे कारण अमेरिकेच्या समाजजीवनात प्रचंड सामर्थ्यवान असलेला यहुदी दबावगट. वित्तसेवा, प्रशासन ते राजकारण वा माध्यमे/ मनोरंजन अशा अमेरिकेच्या सर्व क्षेत्रांत यहुदी व्यक्ती मोठया प्रमाणावर आहेत आणि त्या अमेरिकेच्या प्रशासनावर इस्रायलच्या वतीने सातत्याने दबाव आणत असतात. हा दबाव झुगारून देण्यात अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष जो बायडेन यांस तितकेसे यश इतके दिवस येत नव्हते. त्यामुळे इस्रायलचे फारच फावले. परंतु अखेर बायडेन यांची मंदावलेली सहनशीलता संपली आणि त्यांच्या प्रशासनाने शस्त्रसंधीच्या मागणीस विरोध केला नाही. या घटनेस अनेक अर्थ आहेत आणि तिचे पडसादही अनेक.

त्यातील पहिला लगेच दिसून आला. अमेरिकेने शस्त्रसंधीस विरोध केला नाही हे जाहीर झाल्या झाल्या पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी आपला अमेरिकेचा दौराच रद्द केला. या दौऱ्यात ते अध्यक्ष बायडेन यांच्याशी गाझा युद्धातील आगामी पावलांविषयी चर्चा करणार होते. पण अमेरिकेच्या या 'बदलत्या' भूमिकेमुळे रागावून त्यांनी आपली अमेरिका भेट रद्द केली. घरातील अतिलाडामुळे जास्तच शेफारून गेलेल्या लाडावलेल्या चिरंजीवाने कशास 'नाही' म्हटल्यावर फुरंगटून बसावे तसे हे झाले. इतकेच नाही, तर नेतान्याहू यांनी अमेरिकेच्या या बदललेल्या भूमिकेचा निषेध केला आणि त्यामुळे हमाससारख्या दहशतवादी संघटनेचे फावेल, अशा अर्थाचे मत व्यक्त केले. प्रत्यक्षात परिस्थिती उलट आहे. अमेरिकेच्या आजवरच्या बोटचेप्या भूमिकेमुळे उलट नेतान्याहू यांचेच फावले असून देशांतर्गत राजकारणातील वाद टाळण्यासाठी प्रत्यक्षात ते गाझा युद्धाचा वापर करताना दिसतात. युद्ध थांबले की नेतान्याहू यांचा भ्रष्टाचार आणि भ्रष्ट राजकारण या विषयाच्या चर्चेस तोंड फुटेल आणि अनेक आघाडयांवर या पंतप्रधानांस विरोधकांचा सामना करावा लागेल. तेव्हा ही परिस्थिती टाळण्याचा एकमेव, राष्ट्रप्रेमी मार्ग म्हणजे युद्ध लांबवणे. देशांतर्गत राजकारणात संकटग्रस्त ठरलेल्या राजकारण्यांस परकीय आक्रमक, आक्रमणाची भीती इत्यादी मुद्दे नेहमीच हात देतात. देश संकटात आहे अशी हाळी सर्वोच्च सत्ताधीशानेच दिली की इतरांना आपसूक सत्ताधीशांच्या मागे उभे राहावे लागते. पंतप्रधान नेतान्याहू याचाच फायदा घेताना दिसतात. म्हणूनच त्यांना कोणत्याही परिस्थितीत युद्ध थांबवावे असे वाटत नाही. स्वत:ची खुर्ची वाचावी यासाठी अश्रापांचे प्राण घेण्यात या राजकारण्यांस काहीही वाटत नसेल तर हा इसम किती निर्ढावलेला आहे याची प्रचीती येईल. हा संघर्ष गेले सुमारे पाच महिने सुरू असून त्यात आतापर्यंत ३२ हजारांहून अधिक गाझावासीयांचे प्राण गेले आहेत आणि त्यापैकी दोनतृतीयांश तर केवळ महिला आणि बालके आहेत. तेव्हा हा नरसंहार थांबवणे अत्यावश्यक.

पण तेच नेतान्याहू यांस नको. हमास या दहशतवादी संघटनेने अकारण केलेला दहशतवादी हल्ला हे केवळ निमित्त. त्या हल्ल्याने समग्र गाझा, पॅलेस्टाईनादी परिसर बेचिराख करण्याची संधीच युद्धखोर नेतान्याहू यांस मिळाली. त्या दहशतवादी हल्ल्यामुळे खुद्द नेतान्याहू यांचे पॅलेस्टिनी भूमीतील उद्योग दुर्लक्षित राहिले आणि ज्यांच्या भूमीत इस्रायली बेकायदा घुसखोरी करत होते त्याच भूमीत अधिकृतपणे घुसून सामान्यांचा जीव घेण्यास वाव नेतान्याहू यांस मिळाला. आताही ते 'हमास'चा पुरता बीमोड केल्याखेरीज मी स्वस्थ बसणार नाही अशा वल्गना करतात. पण म्हणजे काय, याचे उत्तर त्यांच्याकडे नाही. हमास ही त्या परिसरात सर्वव्यापी आहे आणि तिचे काही एक कार्यालय आहे, अधिकृत यंत्रणा आहे असे नाही. त्यामुळे कोणाही गाझावासीयांस इस्रायली सैनिक मारतात आणि हमास सदस्यास ठार केल्याचा दावा करतात. या कथित हमासवासीयांच्या शोधासाठी इस्रायली जवानांनी रुग्णालये, युद्धकालीन आसरा केंद्रे, मदत छावण्या यातील काही म्हणून सोडले नाही. युद्धकाळात कशाकशांवर हल्ला करावयाचा नाही, याचे काही संकेत असतात. संयुक्त राष्ट्रांचे मदत कार्यकर्ते, रेडक्रॉसचे स्वयंसेवक वा बातमीदार यांस अपाय केला जात नाही. नेतान्याहू यांनी हे सारे संकेत सहज धाब्यावर बसवले. परिणामी अर्धा डझनहून अधिक पत्रकार आणि संयुक्त राष्ट्रांचे कार्यकर्ते आतापर्यंत या युद्धात मरण पावले आहेत. परिस्थिती इतकी गंभीर की त्यामुळे युद्धग्रस्तांच्या मदतीस, त्यांचे अश्रू पुसण्यास जायला कोणी तयार नाही. गाझा पट्टी हा एक अत्यंत चिंचोळा भूभाग. सर्व बाजूंनी इस्रायल आणि एका बाजूने समुद्र अशी रचना. त्यामुळे गाझावासीयांच्या हालास पारावार उरलेला नाही. परिणामी समुद्रमार्गे आणि विमानातून मदत टाकण्याची वेळ अमेरिकादी देशांवर आली. अशा मदत-वाटपावरही इस्रायलने गोळीबार केल्याच्या तक्रारी आहेत.

इतकी अमानुषता इस्रायल दाखवू शकतो ती केवळ पाठीशी अमेरिका आहे म्हणून. आता अमेरिकेने पाठिंबा दिला नाही तरी आम्ही युद्ध सुरूच ठेवू असे नेतान्याहू म्हणतात. पण त्या फुकाच्या वल्गना. अमेरिकेची आर्थिक-लष्करी-राजनैतिक मदत हा इस्रायलचा प्राणवायू आहे. इस्रायलने काहीही करावे आणि अमेरिकेने त्याकडे डोळेझाक करावी असे त्या देशाच्या जन्मापासूनच चालत आलेले आहे. अमेरिकेच्या इतिहासात एखादा डेमॉक्रेटिक बराक ओबामांचा अपवाद वगळता अन्य सारे नेते इस्रायल खूश ठेवण्यात धन्यता मानतात. त्यात आता तर अमेरिकी निवडणुकांचा काळ. अत्यंत संघटित अमेरिकावासी यहुदींची मते या लढाईत निर्णायक. त्यासाठी माजी अध्यक्ष रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प हे इस्रायलचे वाटेल तितके लांगूलचालन करण्यास तयार आहेत आणि त्यांनी तसे ते अनेकदा केलेही आहे. त्यामानाने डेमॉक्रेटिक पक्षीय इतका ताळतंत्र सोडत नाहीत. त्यामुळे इतके दिवस इस्रायलची मनमानी डेमॉक्रेटिक बायडेन कसे काय सहन करत होते हा प्रश्न होता. अखेर ही निष्क्रियता फारच अंगाशी येते हे पाहिल्यावर बायडेन यांनाही पर्याय राहिला नाही.

# ताठर की तडजोडवादी?



ही गोष्ट आहे, २०१९च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळची. नागपूर मतदारसंघात प्रचार अंतिम टप्प्यात आल्यावर पैशाचा तुटवडा जाणवू लागल्याने वंचितचे कार्यकर्ते अस्वस्थ झाले. त्यांनी उमेदवाराकडे विचारणा केली तर त्यांनीही हात वर केले. प्रचार काय, पत्रके छापायलासुद्धा पैसे नाहीत, असे त्यांचे म्हणणे. त्यामुळे प्रचाराच्या पातळीवर सामसूम असताना शेवटच्या दोन दिवसांत 'वंचित' उमेदवाराची एक अर्धा पान जाहिरात सर्व वर्तमानपत्रात झळकली. त्यात मजकूर होता 'काँग्रेसचे उमेदवार नाना पटोलेंना मत देऊ नका' असा. ही जाहिरात दिली गेली अशा एजन्सीकडून जी तेव्हा आणि आजही फक्त भाजपच्याच जाहिराती प्रसारित करते.

भाजप आणि संघ परिवाराचे कट्टर विरोधक तसेच धर्मनिरपेक्षतेचा आग्रह धरणारे प्रकाश आंबेडकर आणि त्यांचा पक्ष 'वंचित' वर शंका का घेतली जाते यासाठी हे एक उदाहरण पुरेसे ठरावे. या शंकेला वाव देणाऱ्या अनेक घटना गेल्या लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत राज्यात ठिकठिकाणी घडल्या. प्रकाश आंबेडकरांच्या मागे जाऊन भ्रमनिरास झालेल्या अनेक जाणत्या कार्यकर्त्यांनी त्यांची जंत्रीच काढून ठेवली आहे. त्या सर्व घटनांचा उल्लेख इथे करणे अप्रस्तुत. एकीकडे मोदी-शहा आणि भाजपवर जहरी टीका करायची. देश वाचवण्यासाठी त्यांना सत्तेतून बाहेर खेचणे कसे आवश्यक आहे याचे तपशीलवार विवेचन करायचे आणि याच कारणासाठी एकत्र येणाऱ्या समविचारी पक्षांच्या आघाडीत सामील न होता स्वतंत्र निवडणुका लढवून मतविभाजन घडवून आणत भाजपची वाट मोकळी करून द्यायची हाच खेळ प्रकाश आंबेडकर सतत खेळत आले आहेत. या खेळावर कुणी आक्षेप घेऊ नये म्हणून कमालीचे बुद्धिचातुर्य वापरून 'मी किती धर्मनिरपेक्ष' अशी प्रतिमा निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न आता त्यांच्याच अंगलट येऊ लागला आहे.

आताही त्यांनी आघाडीसोबतच चर्चेचे गुऱ्हाळ वाढवत नेत तेच केले. अर्थात या ताटातुटीला ते एकटेच जबाबदार आहेत, असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करणारे ठरेल. पण प्रकाश आंबेडकर आघाडीसोबत जाऊच शकत नाहीत, असा जो समज राज्यातील तमाम राजकीय जाणकारांचा झाला आहे त्याला ते एकटेच जबाबदार आहेत हे मान्यच करायला हवे. प्रकाश आंबेडकरांच्या या नागमोडी वळणाच्या राजकारणावर चर्चा करण्याआधी 'वंचित'च्या जन्माची पार्श्वभूमी तपासायला हवी. २०१८ ला राज्यात धनगर आरक्षणाचा मुद्दा तापलेला होता. भाजप दिलेले आश्वासन पूर्ण करत नाही म्हणून हा समाज संतप्त होता. नेमके तेव्हाच प्रकाश आंबेडकरांचे विश्वासू साथीदार हरिभाऊ भदे अचानक पुढे आले आणि त्यांनी पंढरपूरला या प्रश्नावर एक सभा घेतली. तिथून आकाराला आले ते राज्यात मोठया संख्येत असलेल्या लहान लहान जातींना एकत्र आणण्याचे समीकरण. यातून तयार झालेल्या वंचितला नंतर संघाच्या मुशीत तयार झालेले गोपीचंद पडळकर हळूच येऊन जुळले. हा योगायोग कसा समजायचा? नंतर प्रकाश आंबेडकरांनी या सर्व जातींची मोट बांधत निवडणूक लढण्याची घोषणा केली.

राजकारणातला हा 'तिसरा पर्याय'चा प्रयोग भाजपच्या पथ्यावर पडणारा आहे, हे अनेकांना स्पष्ट दिसत होते. तसा आरोप आपल्यावर होऊ नये म्हणून प्रकाश आंबेडकरांनी लोकसभेच्या वेळी काँग्रेसला १२ जागा देण्याची 'तिरकस चाल' खेळली. त्यामुळे काँग्रेस संतापणे स्वाभाविक होते. नेमके तसेच घडले आणि वंचितच्या उमेदवारांनी राज्यात ४४ लाख मते घेत काँग्रेस व राष्ट्रवादीच्या नऊ जागा पाडण्याची 'कामगिरी' करून दाखवली. पडळकर बारामतीतून लढले, पण पवारांच्या साम्राज्याला धक्का देऊ शकले नाहीत. नंतर हेच पडळकर हळूच भाजपमध्ये सामील झाले आणि आमदार बनले. परिवाराने दिलेली कामगिरी फत्ते करून दाखवल्याचे हे बक्षीस होते. त्यांच्या जाण्यावर प्रकाश आंबेडकरांनी फार खळखळ केली नाही, हे एक विशेष. हा घटनाक्रम त्यांच्यावरचा संशय बळावण्यासाठी कारणीभूत ठरला असा निष्कर्ष कुणी काढला तर त्यात गैर काय?

नंतर लगेच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेस आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष सावध झाले. अनेक नेत्यांनी वंचितची उमेदवारी ज्याच्यापासून फायदा होईल अशांनाच मिळेल अशी 'व्यवस्था' केली. लोकसभेत आघाडीचा पराभव झाल्याने आनंदात असलेले प्रकाश आंबेडकरही निर्धास्त होते. त्याचा फायदा घेत काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मतविभाजन फायद्याचे ठरेल अशांना वंचितकडे पाठवले. त्याचा परिणाम असा की वंचितला मिळालेली मते तब्बल २० लाखांनी कमी होऊन २४ लाखांवर आली. त्यांच्या स्वतंत्र लढण्याचा म्हणावा तितका फायदा भाजपला मिळाला नाही. याला आणखी एक कारण जबाबदार ठरले. वंचितला मत म्हणजे अप्रत्यक्षपणे भाजपला फायदा असा प्रचार आघाडीकडून जाणीवपूर्वक केला गेला. वंचितच्या मागे जाणारा मतदार प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुले, शाहू यांना मानणारा. धर्मांधतेचा राग करणारा. त्यामुळे या प्रचाराचा फटका वंचितला बसला आणि त्यांची मतांची टक्केवारी जवळजवळ ५० टक्क्यांनी घटली. या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकरांच्या आताच्या भूमिकेकडे बघायला हवे.

कोणतीही राजकीय आघाडी करताना आपली राजकीय ताकद किती, समोरच्यांची किती याचा विचार करूनच वाटाघाटी पुढे न्याव्या लागतात. बुद्धिमान असणाऱ्या प्रकाश आंबेडकरांनी या व्यवहारवादाला फाटा दिला. तो जाणीवपूर्वक असे कुणी म्हटले तर त्यात चूक काय? त्यांचे हे सतत बदलण्यामागचे वास्तव आघाडीतील सर्व नेते जाणून होते, पण कुणीही त्यांच्यावर टीका केली नाही. प्रकाश आंबेडकरांवर टीका म्हणजे एका मोठया समूहाला दुखावणे अशी भीती आघाडीतील अनेक नेते आजही बाळगतात. त्यांचा अचूक फायदा घेत वंचितने आघाडीला प्रत्येक वेळी जेरीस आणले. आघाडीत सामील न होण्याचे निमित्त आपण ठरू नये म्हणून प्रकाश आंबेडकरांनी सात जागांवर पाठिंबा देण्याची घोषणा केली. नागपूर लोकसभेत तो दिलासुद्धा! या कसरतीनंतरही त्यांच्यावरचा संशय कायम राहणार कारण त्यांच्या स्वतंत्र लढण्यामुळे इतर ठिकाणी होणारे आघाडीचे नुकसान मोठे असेल. त्यांच्या मागे असलेला बौद्ध तसेच इतर मागास मतदार भाजपकडे वळू शकत नाही हे त्रिवार सत्य. तो आघाडीकडे वळू नये यासाठी सत्ताधाऱ्यांना प्रकाश आंबेडकर प्रत्येक वेळी स्वतंत्रपणे रिंगणात हवे असतात. प्रकाश आंबेडकर म्हणतात त्याप्रमाणे या स्वतंत्र लढण्यामागे कुणाची फूस नसेल ही तर आज सर्वच ठिकाणी 'वंचित'चे उमेदवार ठरवण्यात पुढाकार कोण घेत आहेत, यात सत्ताधारी आघाडीवर कसे याची उत्तरे सर्वांना दिसत आहेत. मतपेढीच्या भरवशावर केले जाणारे हे कथित तडजोडीचे राजकारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित होते काय हा या पार्श्वभूमीवर उपस्थित होणारा कळीचा प्रश्न. वंचितच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या व राजकीयदृष्टया सजग असलेल्या मतदारांना त्याचे उत्तर शोधून निर्णय घ्यावा लागणार आहे.

# श्री मळाईदेवी शिक्षण संस्थांतर्गत चित्रकला स्पर्धा व चित्रांचे भव्य प्रदर्शन संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मलकापूर: आ.च.विद्यालय मलकापूर येथे संस्थांतर्गत चित्रकला स्पर्धा व चित्र प्रदर्शनाचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.ज्येष्ठ कलाशिक्षक एल.डी.माने यांच्या हस्ते स्पर्धा व चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, कला आपले विचार व कौशल्य प्रकटीकरणाचे साधन आहे. कलेचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देवून प्रोत्साहन दिले.

संस्थेचे सचिव, शेतीमित्र अशोकराव थोरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले माणसांकडे कोणती ना कोणती कला असली पाहिजे,कलेनेच मनुष्याला पूर्णत्व प्राप्त होते. विद्यार्थ्यांमधील नैसर्गिक कलागुणांना वाव देण्याचं काम संस्था पातळीवर होत असल्याचेही त्यांनी सांगितले.



संस्थेचे संचालक वसंत चव्हाण यांनी चित्रकला ही श्रेष्ठ कला कोणतीही श्रेष्ठच असते असे मत व्यक्त केले. संस्थेचे खजिनदार तुळशीराम शेळके यांनी प्रदर्शनाला सदिच्छा भेट देऊन समाधान व्यक्त केले.

या स्पर्धेत संस्थेतील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला.कार्यक्रमास संस्थेचे संचालक प्रा.संजय थोरात, विभाग प्रमुख प्रा.शीला पाटील, उपमुख्याध्यापक ए.बी.थोरात, पर्यवेक्षक बी.जी.बुरुंगले, सर्व शिक्षक तसेच मळाई देवी शिक्षण संस्थेतील प्रत्येक विद्यालयातील चित्रकला शिक्षक,विद्यार्थी उपस्थित होते. या स्पर्धेचे आयोजन कलाशिक्षक आर.एस.पांढरपट्टे यांनी केले.


विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.एस.ए. कुंभार यांनी प्रास्ताविक केले, सूत्रसंचालन एस.के.तांबवेकर यांनी केले. उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार सौ.एस.ए.पाटील यांनी मानले.

# आला उन्हाळा आरोग्य सांभाळा..!



**श्याम ठाणेदार**
**पुणे**

राज्यात सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली आहे. मार्च महिन्याच्या मध्यापासून राज्यातील तापमान वाढायला सुरुवात झाली होती. सर्वत्र उकाडा जाणवत होता. आता मार्च महिन्याच्या अखेरीस तर राज्यातील अनेक शहरांचे तापमान उच्चांकी पातळीवर पोहचले आहे. राज्यातील अनेक शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात पोहचले आहे. काही शहरांनी तर ४० अंशाचा आकडा देखील पार केला आहे. विदर्भ मराठवाड्यात तर तापमानाने आजच उच्चांक गाठला आहे. पुढील दोन आठवड्यात राज्यातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंश सेल्सिअसच्या घरात पोहचेल आणि राज्यात प्रचंड उकाडा जाणवेल असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. पुढील दोन महिने राज्यातील तापमान उच्चांकी अंशावर पोहचेल आणि राज्यात यावर्षी प्रचंड उकाडा जाणवेल हा हवामान खात्याने वर्तवलेला अंदाज खरा ठरताना दिसत आहे. याशिवाय यावर्षी राज्यात उष्णतेच्या लाटा येतील असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. हा अंदाज नागरिकांची झोप उडवणारा ठरत आहे कारण मार्च महिन्यातच सूर्यनारायणाने आपला प्रकोप दाखवायला सुरुवात केली असल्याने पुढील दोन महिने कसे निघेल याच चिंतेत नागरिक आहेत. पुढील दोन महिन्यात राज्यात उष्णतेच्या लाटा येणार असून तापमान प्रचंड वाढणार असल्याने हे दोन महिने जनतेसाठी जीकरीचे ठरणार असल्याने उन्हापासून बचाव करण्याची कसरत नागरिकांना करावी लागणार आहे. उन्हाळा सुरू झाला की नागरिकांना आरोग्याच्या तक्रारी जाणवू लागतात. उन्हाळ्याच्या झळा वाढल्या की थकवा येणे, चक्कर येणे, हातापायाला गोळे येणे, उष्माघात आणि मृत्यू असे परिणाम माणसांमध्ये दिसून येतात. काहींना डोळ्याचे तर काहींना त्वचेचे विकार जडतात. उन्हाळ्यात विविध प्रकारचे श्वसन विषयक, मेंदूचे आणि हृदयाचे आजार होतात. रक्तदाब आणि मधुमेहासारख्या व्याधी असलेल्या व्यक्तींनी उन्हाळ्यात विशेष खबरदारी घ्यावी. उन्हाळ्यात उष्माघात होण्याचे प्रमाण खूप वाढते. उष्माघातामुळे शरीराचे तापमान उच्च पातळीवर पोहचते. योग्य आणि वेळीच उपचार न मिळाल्यास संबंधित व्यक्ती दगावण्याची शक्यता असते. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी घराबाहेर पडणे टाळावे. दुपारी बारा ते चार घराबाहेर पडूच नये, काही महत्वाचे काम असेल तरच घराबाहेर पडावे. घराबाहेर पडताना टोपी, गॉगल, बूट, चपलांचा वापर करावा. हलकी, पातळ, सच्छिद्र कपडे वापरावेत. उन्हात काम करणाऱ्या व्यक्तींनी टोपी, छत्री, गॉगल यांचा नियमित वापर करावा. तापमान वाढले की शरीरातील पाणी कमी होते त्यामुळे डीहायड्रेशन होते. डीहायड्रेशन झाले की शरीरातील पाणी झपाट्याने कमी होते आणि चक्कर येते. त्यामुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी सतत पाणी पीत राहावे. शरीरात दररोज किमान दोन लिटर पाणी जाणे गरजेचे असते. घराबाहेर पडताना पाण्याची बाटली सोबत न्यायला विसरू नका. साध्या पाण्यासोबत नारळपाणी, भाज्यांचे, फळांचे रस दररोज प्यायले तरी हरकत नाही. मार्च महिन्यातच उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्याने पुढील दोन महिने उष्णतेची तीव्रता किती असेल याची कल्पना केली तरी या वर्षीची उन्हाची दाहकता लक्षात येईल. त्यामुळेच प्रत्येकाने उन्हाळ्यात आपले आरोग्य सांभाळणे गरजेचे आहे. खबरदारी घेऊनच आपण उन्हाच्या तीव्रतेपासून स्वतःचा बचाव करू शकतो.





# वाघांच्या मृत्यूंचे रहस्य



२०२२ च्या व्याघ्रगणनेनुसार देशात एकूण ३,६८२ वाघ आहेत. आधीच्या तुलनेत एकूण ७१५ वाघ देशांच्या विविध जंगलांमध्ये वाढले असल्याचे या गणनेतून स्पष्ट झाले. ही व्याघ्रसंख्या बरीच मोठी आहे. भारतात आढळणारा पट्टेदार वाघ वाचविण्यासाठी आणि त्याच्या संवर्धनासाठी काही वर्षात अनेक प्रयोग आणि उपाय योजना करण्यात आल्या आहेत. वय झाल्यामुळे किंवा जंगलातील दोन वाघांमधील संघर्षात झालेले मृत्यू नैसर्गिक समजले जातात.याव्यतिरिक्त जेथे जेथे मानवी हस्तक्षेप असेल, अशा व्याघ्रमृत्यूंना अनैसर्गिक म्हटले जाते. यामध्ये, रस्त्यावरील वाहने किंवा रेल्वेची धडक, विद्युतधक्का,शिकार, पाणवठ्यात विष कालवणे, जंगलात फिरताना कठडे नसलेल्या विहिरी किंवा अन्य जलाशयांत पडणे अशा विविध कारणांमुळे वाघांचे मृत्यू होतात.या सर्व मृत्यूंचा अनैसर्गिक मृत्यूंमध्ये समावेश होतो.

यंदा भारतात २०३ वाघांचे मृत्यू नोंदविण्यात आले.त्यातील सर्वाधिक व्याघ्रमृत्यू महाराष्ट्रात झाले आहेत. महाराष्ट्रात ५३ वाघांचे मृत्यू झाले आहेत. त्यातील निम्म्याहून अधिक मृत्यू चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांतील आहेत. दरवेळी सर्वाधिक व्याघ्रमृत्यू होणार्या शेजारच्या मध्य प्रदेशात यंदा ४७ मृत्यू नोंदविले गेले. त्याखालोखाल उत्तराखंडमध्ये २६, तामिळनाडूमध्ये १५ आणि केरळमध्ये १४ वाघांना विविध कारणांनी जीव गमवावा लागला आहे. मागील पाच वर्षात व्याघ्रमृत्यूंमध्ये झालेल्या वाढीत अनैसर्गिक मृत्यूंचा वाटा मोठा आहे. त्यातही शिकार आणि विद्युतधक्क्याने होणारे मृत्यू या प्रकारांचा सर्वाधिक समावेश आहे. देशातील २०३ मृत्यूपैकी १४७ हे नैसर्गिक आणि ५५ अनैसर्गिक आहेत. त्यामुळे,अनेक उपाय करूनही देशभरातील यंत्रणांना वाघांच्या वाढत्या अनैसर्गिक मृत्यूसंख्येवर अंकुश लावता आलेला नाही.

महाराष्ट्रात जे ५३ वाघमृत्यू नोंदविण्यात आले आहेत त्यामध्ये संघटित शिकारी टोळ्यांनी केलेल्या वाघांच्या शिकारींचाही समावेश आहे.जुलैमध्ये चंद्रपूर जिल्ह्यात शिकार झालेल्या वाघाची कातडी आसाममध्ये जप्त करण्यात आली होती. त्यानंतर एक मोठे नेटवर्कच उघडकीस आले आणि त्यावर कारवाई झाली.२०१३ नंतर महाराष्ट्रात इतक्या संघटितपणे शिकारी पुन्हा सुरू झाल्याचे या घटनेने सिद्ध केले.या शिकारीमध्ये हरियाणा आणि पंजाब राज्यांतील बवेरिया या भटक्या आणि शिकारीसाठी कुख्यात असलेल्या शिकार्यांचा समावेश आहे. देशभरात वाघांची शिकार करून देशात आणि देशाबाहेर त्यांच्या अवयवांची विक्री करण्याच्या उद्योगात हे शिकारी असतात. याशिवाय, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमेला लागून असलेल्या कटनी परिसरातील बहेलिया समुदायही संघटित शिकारींसाठी ओळखला जातो.यातूनच अलीकडे वाघांचे मृत्यू झाल्याचे दिसून आले आहे.या सगळ्याच्या मुळाशी वाघ आणि त्यांच्या अवयवांच्या तस्करीतून येणारा पैसा आहे.

काही वर्षाच्या प्रयत्नातून वाघांची संख्या वाढली,याबद्दल एकीकडे आनंद व्यक्त होत असतानाच दुसरीकडे मात्र वाघांच्या वाढत्या अनैसर्गिक मृत्यूसंख्येवर शासकीय यंत्रणेला अंकुश लावता आलेला नाही हे विदारक वास्तवही नाकारता येणार नाही. या वाघांना सामावून घेण्यासाठी पुरेसे जंगल आहे का,त्यांच्या भ्रमणाचे मार्ग उपलब्ध आहेत का, मानवी वस्तींवरील होणारे हल्ले, जंगलातील अतिक्रमणे आणि जंगलाची सुरक्षा असे अनेक मुद्दे या वाघांच्या जन्म मृत्यूच्या चक्राशी जोडले गेले आहेत.त्यांची बदलणारी समीकरणे वाघांच्या आकडेवारीतही बदल करतात. वाघांचे अनैसर्गिक मृत्यू रोखण्यासाठीही या उपाययोजना योग्य प्रकारे होणे,हीच महत्त्वाची बाब आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# भुजबळांविरुद्ध मराठा उमेदवार

## नाशिकमधून जरांगेंना पाठवला अहवाल



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई-महायुतीतील जागावाटपावर अंतिम निर्णय झाला असून आजच उमेदवारांच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता आहे. मात्र, नाशिकच्या जागेवरुन सध्या महायुतीत आलबेल नसल्याचे समजते. नाशिक लोकसभा मतदारसंघातील विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांना तिकीट मिळणार की नाही, यावरुन खलबते सुरू आहेत. त्यामुळे, नाशिकची जागा कोणाला सुटणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यातच, नाशिकच्या जागेवर अजित पवार गटाने बाजी मारली असून मंत्री छगन भुजबळ यांना नाशिकमधून महायुतीची उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. मात्र, भुजबळ यांना उमेदवारी मिळाल्यास सकल मराठा समाजाच्यावतीने उमेदवार देण्यात येणार असल्याचे बैठकीत ठरले आहे.

मराठा आरक्षणच्या मुद्द्यावरुन उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील आणि मंत्री छगन भुजबळ यांच्या चांगलंच वाकयुद्ध रंगलं होतं. दोघांनीही एकमेकांवर जोरदार टीका केली होती. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यास आमचा विरोध असल्याचं छगन भुजबळ यांनी म्हटलं. त्यानंतर, मनोज जरांगे आणि भुजबळ यांच्यात जुंपल्याचं पाहायला मिळालं. आता, निवडणुकांच्या राजकीय मैदानातही ही लढाई पुन्हा पाहायला मिळणार आहे. नाशिक लोकसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचा उमेदवार निश्चित झाल्याचे समजते. या जागेवर मंत्री छगन भुजबळ किंवा त्यांचा पुतण्या समीर भुजबळ यांना तिकीट दिलं जाण्याची शक्यत आहे. त्यामुळे, येथील सकल मराठा समाज आक्रमक झाला आहे.

सकल मराठा समाजाने नाशिकच्या नांदूरनाका परिसरातील शेवंता लॉन्समध्ये निवडणुकांच्या अनुषंगाने बैठक आयोजित केली होती. या बैठकीत लोकसभा निवडणुकांवर चर्चा झाली. यावेळी, मंत्री छगन भुजबळ यांनी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन घेतलेल्या भूमिकेवरुन मराठा समाज बांधव आक्रमक झाले आहेत. त्यामुळे, नाशिक मतदारसंघातून भुजबळ किंवा त्यांचा पुतण्या उमेदवार असल्यास, सकल मराठा समाजही मराठा उमेदवार मैदानात उतरवणार आहे, असा निर्णयच येथील बैठकीत झाला. मराठा समाज बांधवांकडून या बैठकीचा अहवाल मनोज जरांगे पाटील यांना पाठवण्यात येणार असून मराठा उमेदवाराची चाचपणीही समाजाने सुरू केल्याची माहिती आहे. त्यामुळे, नाशिकमध्ये भुजबळ यांना तिकीट मिळाल्यास तिरंगी सामना होणार आहे.

# निवडणूकीच्या विविध टप्प्यांवर सुरक्षेच्या उपाययोजना करा : डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : महसूल प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने परस्पर समन्वयाद्वारे निवडणुकीच्या विविध टप्प्यांवर सुरक्षेच्या आवश्यक उपाययोजना कराव्यात आणि निवडणुका मुक्त आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठीचे नियोजन करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.



विभागीय आयुक्त कार्यालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे आयोजित पुणे विभागाच्या निवडणूक आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ.सुहास दिवसे, सह पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस विशेष महानिरीक्षक सुनील फुलारी, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, महसूल उपायुक्त वर्षा लड्डा-उंटवाल, शिरुर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे आदी उपस्थित होते.

डॉ.पुलकुंडवार म्हणाले, आदर्श आचारसंहिता आणि भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन होईल याकडे विशेष लक्ष द्यावे. त्यासाठी निवडणूक आराखडा योग्यरितीने तयार करावा आणि त्यात सूक्ष्म बाबींचाही समावेश असावा. आंतरजिल्हा आणि आंतरराज्य समन्वयासाठीदेखील योग्य नियोजन करावे. पैशाचा आणि बळाचा वापर होऊ नये आणि नागरिकांना निर्भयपणे मतदान करता येईल यादृष्टीने प्रतिबंधक उपाययोजना कराव्यात. युवक आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदानासाठी प्रोत्साहीत करावे. पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये याची दक्षता घेण्यासोबत मतदारांना त्यांचे मतदान केंद्र शोधण्याविषयी व्यापक जनजागृती करावी. उन्हाळ्यातील वाढते तापमान लक्षात घेता सकाळी आणि सायंकाळी दोन तास मतदानासाठी गर्दी होईल हे लक्षात घेऊन आवश्यक व्यवस्था करावी. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर मतदान कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी. क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष मतदान केंद्रांना भेट देऊन तेथील समस्या जाणून घ्याव्यात, असे निर्देशही विभागी आयुक्तांनी दिले.

# वाई वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड.रविंद्र भोसले तर सचीवपदी ॲड.अक्षय भाडळकर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

वाई: येथील वाई वकील संघाच्या वार्षिक निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड रविंद्र भोसले तर सचीव पदी ॲड. अक्षय भाडळकर यांची बिनविरोध निवड झाली. वाई वकील संघाची २०२३-२४ साठीची निवडणुक नुकतीच संपन्न झाली. सर्व सदस्यांनी ही निवडणुक बिनविरोध करण्याचा मानस केला होता. त्यामुळे बिनविरोध झालेल्या या निवडणुकीत अध्यक्षपदीॲड रविंद्र भोसले तर उपाध्यक्षपदी ॲड. भारती कोरवार यांची बिनविरोध निवड झाली. तसेच सचिवपदी ॲड. अक्षय भाडळकर, सह सचिव पदी ॲड. चारुशिला गिमवेकर व खजिनदार पदी ॲड. विठ्ठल कदम व सदस्य पदी ॲड. अविनाश



गजरे,ॲड. ऋषिकेश कुंभार, ॲड. गणेश मोरे,ॲड. स्मिता जाधव, ॲड. उर्मिला पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या निवडणुकीसाठी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन ॲड. साहेबराव बामणे यांनी काम पाहिले. नवनियुक्त पदाधिकार्यांचे ॲड. रमेश यादव, ॲड. संजय खडसरे, ॲड. राजेंद्र लोखंडे,ॲड. श्रीकांत चव्हाण, ॲड. महेश शिंदे, ॲड. सागर मोरे,ॲड. सुमन जाईकर, ॲड. मृण्मयी महांगडे, ॲड. मिलिंद देशपांडे, ॲड. जयंत गायकवाड, ॲड. साहेबराव बामणे, ॲड. प्रतापराव शिंदे,ॲड.. शशिकांत हेरकळ तसेच सर्व सदस्य तसेच विविध स्तरातुन अभिनंदन करण्यात आले.

# विटा येथे मतदान जनजागृतीसाठी महासायकल रॅली

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

विटा: विटा येथे मतदान जनजागृती महासायकल रॅलीचे प्रांताधिकारी , तहसीलदार गटविकास अधिकारी व . मुख्याधिकारी, आणि गटशिक्षणाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये दिनांक २७ मार्च बुधवार २०२४ रोजी सकाळी - ७.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक विटा येथे मतदान जनजागृती जागृती महासायकल रॅली चे आयोजन करण्यात आले होते

या रॅली मध्ये खानापूर पंचायत समिती अधिकारी व कर्मचारी, सायकल प्रेमी क्लब विटा, विटा हायस्कूल विटा, महात्मा गांधी विद्यामंदिर विटा,



के.के गुळवणी माध्यमिक शाळा विटा, सौ. इंदिराबाई भिडे कन्या शाळा विटा, व बळवंत कॉलेज विटा या शाळा मधील एकूण २०० विद्यार्थी व विद्यार्थिनी व सायकलिस्ट यांनी सहभाग घेतला एक राष्ट्रीय कार्य म्हणून सायकल रॅलीच्या माध्यमातून मतदान जनजागृती करणे मतदानाची टक्केवारी वाढवणे इत्यादी संदर्भामध्ये घोषणा देऊन जनजागृती करण्यात आले गटशिक्षणाधिकारी तथा स्विप प्रमुख विकास राजे यांनी रॅलीला मार्गदर्शन केले व आभार मानले..

या रॅलीमध्ये विद्यार्थी, शिक्षक, खानापूर पंचायत समिती अधिकारी व कर्मचारी सायकलिस्ट, त्याचबरोबर शाळांचे शिक्षक, केंद्रप्रमुख दिलीपकुमार सानप ,नवनाथ कदम, सचिन लवळे, सायकल प्रेमी क्लब चे अध्यक्ष सतीश शिंदे, गणेश ठोंबरे संग्राम कचरे,सागर कचरे व विटा शहरातील ग्रामस्थ व सायकल प्रेमी इत्यादी उपस्थित होते.

# तणावमुक्त जीवनासाठी सकारात्मक विचार महत्त्वाचा:मालेकर

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कराड: मानवी जीवन ही आपल्याला मिळालेली एक संधी आहे. यामध्ये स्वतःला ओळखा दुसऱ्याची सुखदुःखे पाहून स्वतःच्या जीवनाची या सुखदुःखाची कल्पना करू नका तुम्ही कोण आहात हे जगाला माहिती आहे त्याची जाहिरात करू नका. स्वभावाला मोकळेपणा द्या तुम्ही आल्यामुळे समोरच्याला आनंद वाटेल असे जगाव आणि वागावे. वास्तव परिस्थितीचा स्वीकार करायला शिका अडचणी आयुष्यात या येणारच त्याचा बाऊ करू नका एखाद्या गोष्टीकडे सकारात्मकतेने बघा जीवनात आनंदी व्हाल सकारात्मक विचारच मानवाचे तणाव घालवू शकतो. असे मनोगत प्रा.डॉ. निलेश मालेकर यांनी व्यक्त केले. रयत शिक्षण संस्थेचे, सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड




मध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत आनंदी जीवनासाठी तणाव मुक्तीचे रहस्य या विषयावर व्याख्यानाचे आयोजन मंगळवार दि.२६/०३/ २०२४ रोजी करण्यात आले होते.

प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ. निलेश मालेकर कृषीशास्त्रज्ञ तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने हे होते.या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. ए. पाटील, प्रा.नेताजी सूर्यवंशी, प्रा.माधुरी कांबळे, प्रा. आर. वाय. पाटील, रजिस्टार डॉ. अरुणकुमार सकटे, संदीप जाधव, संतोष पवार आदी मान्यवर उपस्थित होते.


अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने म्हणाले की, प्रा. डॉ. निलेश मालेकर एक उत्तम शास्त्रज्ञ आहेत. त्यांचे काम प्रत्यक्ष फिल्डवर्क असे आहे त्यामुळे त्यांचा संबंध शेतकऱ्यांची येतो. त्यामधून नानाविध स्वभावाची माणसे त्यांना कळतात जीवन आनंदी आणि सुखी करायचे असेल तर तुम्ही जगा आणि इतरांनाही जगू द्या घरचे प्रश्न घरी सोडवा नोकरीच्या ठिकाणी चे प्रश्न नोकरीच्या ठिकाणी सोडवा जीवन एक अनिश्चितेचा खेळ आहे उद्या काय होईल हे आज सांगता येत नाही. त्यासाठी आज चांगले जगा ऋण काढून सन करू नका इतरांच्या कामाचे मनापासून कौतुक करायला शिका. तुम्ही आनंदी व्हाल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागत व पाहुण्यांचा परिचय रजिस्टार डॉ. अरुणकुमार सकटे यांनी करून दिला. तर ग्रंथपाल प्रा. महेश गायकवाड यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी सर्व प्राध्यापक शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.कोमल कुंदप यांनी केले.

# धोम धरणाखालील नवा पूल वाहतुकीसाठी सज्ज

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

वाई: वाई धोम धरणाच्या खाली व्याहळी ते धोमला जाणाऱ्या कृष्णा नदीच्या पात्रावरील नवीन पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून या पुलामुळे पश्चिम भागाच्या वैभवात भर पडली आहे व जोर व जांभळी खोऱ्यातील नागरिकांना व पर्यटकांना वाईहून येण्या-जाण्यासाठी लागणारे अंतर वेळ इंधनाचा खर्च याची बचत होणार आहे.



या भागात धोम बलकवडी धरणे त्यांची जलाशय नौका विहार सह्याद्री पर्वतांचे निसर्ग सौंदर्य धोम येथील पुरातन देवदेवतांची मंदिरे गायमुख पाहण्यासाठी धार्मिक व पर्यटकांची वाढ होऊन स्थानिक बेरोजगार युवक नागरिकांना व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

महाबळेश्वरमध्ये उगम पावलेल्या कृष्णा नदीवर प्रथम धोम व नंतर बलकवडी येथे धरणे बांधण्यात आली या धरणामुळे राज्यातील हजारो एकर जमीन जमीन ओलिता खाली आली. व दुष्काळी भागालाही पाणी मिळाले मात्र येथील भूमिपुत्रांना विस्थापित व्हावे लागले त्यांनी राष्ट्र हितासाठी त्याग केला येथील दोन्ही भागातील या पुलाची मागणी गेली कित्येक वर्षांपासून होती कारण पावसाळ्यात तसेच कधीही पलीकडे जायचे म्हटले की वाई शहरातून जाण्याशिवाय पर्याय नव्हता जवळ जवळ १६ किमी अंतर अधिक प्रवास त्यासाठी वेळ इंधन नाहक खर्ची पडत होता या नवीन पुलामुळे तो वाचणार आहे त्यामुळे येथील जनतेत समाधानाचे वातावरण व्यक्त होत आहे आणि पर्यटकांची संख्या वाढून स्थानिक युवक नागरिक याना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत व्याहली ते धोम या रस्त्यासाठी निधी उपलब्ध झाला असून लवकरच हा रस्ताही पूर्ण होईल असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# 'जीतो'च्यावतीने 'अहिंसा रन रॅली'चे ३१ मार्च रोजी आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर: जैन इंटर नॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जीतो) ही सामाजिक स्तरावर कार्य करत असलेल्या संघटना आहे, आर्थिक सदृढता, ज्ञान, सेवा ही उद्दिष्ट ठेवून सपूर्ण जगात २६ ठिकाणी आणि भारतामध्ये ८५ शहरामध्ये कार्य करीत आहे. या संघटनेच्या कोल्हापूर शाखेच्या वतीने ३१ मार्च रोजी 'अहिंसा रन रॅली ही मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. पोलीस ग्राऊंडवर पहाटे ५.३० वा. जीतोचे संस्थापक चेअरमन संजय घोडावत आणि व्हाईस चेअरमन नेमचंद संघवी यांच्यासह विविध मान्यवर ध्वज दाखवून याचा प्रारंभ करणार आहेत. यामध्ये सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन कोल्हापूर चॅप्टर गिरीष शहा, अनिल पाटील आणि जिल्हा कार्यकारिणीने केले आहे.



मनात असलेले अहंकार, राग, मत्सर, स्वार्थ असे दूषित विचारामुळे सर्वत्र हिंसाचार घडत आहेत. प्रत्येकाच्या मनातील दुषित विचारावर मात करण्यासाठी प्रेम, दया, क्षमा, शांती संदेश महत्वपूर्ण ठरतो. जगा व जगू दया या उपदेशा मधून अहिंसा आणि शांतता प्रस्थापित होत आहे. आज या विचारांचा प्रसार होणेची मोठी गरज आहे. जगभर शांतता नांदावी व अहिंसेचा प्रसार व्हावा या उद्देशाने जीतो संघटनेचे जगातील २६ देशात आणि भारतात विविध शहरात ८० चॅप्टर वतीने अहिंसा रॅलीचे आयोजन केले आहे. यामध्ये ३-५ आणि १० किलोमीटर अशा तीन गटात ही रॅली संपन्न करण्यात येणार आहे. रविवार दिनांक ३१ मार्च २०२८ रोजी सकाळी ५.३० वाजता परदेशात २६ ठिकाणी व देशात ८० ठिकाणी एकाच दिवशी एकाच वेळी लाखो लोक जगात शांतता आणि अहिंसा विचार घेऊन धावणार आहेत. या रॅलीमध्ये सहभागी होण्यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करावे लागणार आहे.

ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम तारीख २९ मार्च २०२४ पर्यन्त आहे. ऑफ लाईन व ऑनलाइन फॉर्म भरून आपले रजिस्ट्रेशन करता येते. यासाठी Registration Link - https: / /registrations. indiarunning. com/ ahimsa-run-kolhapur/ www. ahimsarun.com व्दारे नोंदणी करता येणार आहे. अहिंसा रन रॅली मध्ये १३ वर्षा वरील सर्वजण स्त्री पुरुष भाग घेऊ शकतात. कोल्हापुरच्या अहिंसा रन रॅलीमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन कोल्हापूर नगरीतून प्रेमाचा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचवू यासाठी जीतो कोल्हापूर परिवार सर्वांना आमंत्रित करीत आहेत. जगात आणि देशात एकाच दिवशी एकाच वेळी या रॅलीमध्ये लाखो लोक धावणार आहेत. या रॅलीचे नोंद गिनिज बुकमध्ये आणि लिम्का बुकमध्ये यावर्षी ही नोंद होईल असा संकल्प केला आहे. या रॅलीमुळे जगात शांतता आणि अहिंसा विचारांचा प्रभाव वाढेल. सर्वत्र शांततामय वातावरण निर्माण होईल हि भावना ठेऊन सर्व समाजातील लोकांनी एकजुटीने या अहिंसा रॅलीमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन जीतोच्या पदाधिकारी यांनी केले आहेत. या स्पर्धेच्या संयोजनासाठी चेअरमन गिरीष शहा ' रोम कनव्हेनर जितेंद्र राठोड , उपाध्यक्ष रवी संघवी, मुख्य सचिव अनिल पाटील, खजानीस रमणलाल संघवी, सदस्य शितल गांधी, महिला आघाडी च्या अधक्षा श्रेया गांधी सचिव माया राठोड , सह सचिव स्विटी पोरवाल - पूजा काले, युवा आघाडीचे अध्यक्ष चिंतन राठोड, सचिव चिन्मय कर्णावट सह जयेश ओसवाल १०० हून अधिक जीतो कोल्हापूर चॅप्टरचे कार्यकर्ते डी.सी. प्लाझा दुसरा मजला महावीर कॉलेजसमोर असेंब्ली रोड या मुख्यालयातून कार्यरत आहे. ऑन लाईन सह अधिक माहिती आणि थेट सहभाग नाव नोंदणी या कार्यालयात भेट घावी असे आहवान ही संयोजक जीतो कोल्हापूर चॅप्टर यांनी केले आहे.

# शिराळा येथे मतदार जनजागृतीसाठी सायकल रॅली



**शिराळा येथे मतदार जनजागृती अभियानांतर्गत आयोजित सायकल रॅलीत सहभागी संतोष राऊत, पोपटराव मलगुंडे, धोंडीराम गोसावी, जगन्नाथ पाटील, तानाजी माने, सुहास रोकडे, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी**

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा: लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ अंतर्गत मतदार जनजागृती अभियान सर्वत्र राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आज शिराळा पंचायत समितीच्या वतीने शिराळा येथे सायकल रॅली चे आयोजन करण्यात आले. पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि शेकडो विद्यार्थी यांच्या उपस्थितीत ही सायकल रॅली संपन्न झाली. ही रॅली पोटे चौक, मरीमी चौक, मारुती मंदिर ते शिराळा एसटी स्टँड आणि पंचायत समिती अशी पार पडली.

या रॅलीत शिराळा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संतोष राऊत, गटशिक्षणाधिकारी तथा मतदार जनजागृती अभियानाचे नोडल ऑफिसर पोपटराव मलगुंडे, शिक्षण विस्तार अधिकारी धोंडीराम गोसावी, जगन्नाथ पाटील, केंद्रप्रमुख तानाजी माने, सुहास रोकडे, तानाजी जाधव, उपक्रमशील शिक्षक मोहन पवार, दीपक रोकडे, प्रताप गायकवाड, महादेव हवालदार, संजय सुतार, श्रीरंग गायकवाड, परशुराम टिळे, प्रदीप महामुनी, संजय सुकते, दीपक जाधव, रमेश शेंडगे उपस्थित होते. न्यू इंग्लिश स्कूल आणि सद्गुरु आश्रम शाळेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने या रॅलीत सहभागी झाले. स्वागत केंद्रप्रमुख सुहास रोकडे यांनी केले. आभार तानाजी माने यांनी मानले.

# नितीन गडकरींचं वार्षिक उत्पन्न ५४ लाख

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई-देशातील लोकप्रिय नेते आणि केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर लोकसभा मतदारसंघातून भाजपाच्या तिकिटावर उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवी, प्रदेशाध्यक्ष बानवकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व हजारो कार्यकर्त्यांच्या उत्साही जल्लोषात गडकरींनी आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. गडकरी यांनी अगोदरच सांगितले की, माझी ही लढाई विकासासाठी आहे, त्यामुळे मी प्रचारासाठी कुठलाही वायपट खर्च करणार नाही. लोकांनी मला मी केलेल्या कामाच्या जोरावर निवडून द्यावे. त्यामुळेच, गडकरींची जनमानसांत वेगळीच प्रतिमा आहे.

नितीन गडकरी हे देशाचे दळणवळण व रस्ते बांधकाम मंत्री आहेत. त्यामुळे, हजारो, लाखो कोटींच्या विकास प्रकल्पांची कामे त्यांच्या नेतृत्वात देशात सुरू असतात. त्यामुळे, त्यांची संपत्ती आणि त्यांचं वार्षिक उत्पन्न किती हे जाणून घेण्याची उत्कंठा सर्वांनाच असते. नागपूर लोकसभा मतदारसंघातून त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर त्यांच्याकडी संपत्तीचं विवरण आणि वार्षिक उत्पन्न याबाबतची माहिती त्यांनी निवडणूक आयोगाला दिली आहे. उमेदवारी अर्जात गडकरी यांनी संपत्ती विवरणाची माहिती दिली असून लाखो कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी देणाऱ्या नितीन गडकरी यांचे वार्षिक उत्पन्न ५४ लाख एवढे आहे. तर, त्यांच्यावर २ कोटी ४ लाख रुपयांचे कर्जही आहे. त्यामुळे, अनेकांना आश्चर्य वाटत आहे. कारण, ज्या



रोडची कामे गडकरींच्या सहीने ठेकेदारांना दिली जातात, त्या ठेकेदारांचे वार्षिक उत्पन्न हे गडकरींपेक्षा अधिक आहे.

उमेदवारी अर्जात दिलेल्या माहितीनुसार, २०१९ साली गडकरी व त्यांच्या पत्नीकडे मिळून १० कोटी २७ लाख ३४ हजार ८५४ रुपयांची संपत्ती होती. तर २०२४ मध्ये हा आकडा १५ कोटी ५२ लाख ६० हजार ४६ इतका झाला. २०१९ साली गडकरी दांपत्यावर १ कोटी ६२ लाख २९ हजार रुपयांचे कर्ज होते. पाच वर्षांत कर्जाचा आकडा वाढून २ कोटी ४ लाख ९१ हजार १४० वर पोहोचला आहे. २०१७-१८ साली गडकरी दांपत्याचे वार्षिक उत्पन्न ४५ लाख ८३ हजार रुपये होते. २०२२-२३ मध्ये त्यात १८.८४ टक्क्यांची वाढ होऊन तो आकडा ५४ लाख ४६ हजार ९० इतका झाला आहे.

निवडणूक शपथपत्रात संपत्तीचे विस्तृत विवरण दिले आहे. त्यानुसार गडकरी, त्यांच्या पत्नी कांचन यांच्या नावे मिळून एकूण १५.५२ कोटींची संपत्ती आहे. मागील पाच वर्षांत गडकरी दांपत्याच्या संपत्तीत ५१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तर एकूण कर्जाची रक्कमदेखील वाढली आहे.

२०१९ ते २०२४ या कालावधीत गडकरी व त्यांच्या पत्नीच्या नावे कुठलीही नवीन अचल संपत्तीची खरेदी झालेली नाही. २०१९ साली त्यांच्याकडे ८ कोटी ६५ लाख ९७ हजार रुपये मूल्याची अचल संपत्ती होती. आता त्याचे मूल्यांकन १२ कोटी ९४ लाख ८३ हजार इतके आहे. अचल संपत्तीमध्ये १ कोटी ५७ लाख ४१ हजारांची धापेवाडा येथे १५ एकर शेतजमीन, वरळी येथील ४ कोटी ९५ लाख चालू बाजारमूल्य असलेला फ्लॅट, धापेवाडा येथील १ कोटी २८ लाख ३२ हजारांचे वडिलोपार्जित घर, उपाध्ये मार्ग येथील ५ कोटी १४ लाखांचे घर यांचा समावेश आहे. केवळ नितीन गडकरी यांच्या नावे १ कोटी ३२ लाख ९० हजारांची चल संपत्ती व ४ कोटी ९५ लाखांची अचल संपत्ती आहे. २०१९ साली गडकरी व त्यांच्या पत्नीकडे एकूण सहा कार होत्या व त्यांचे तत्कालिन मूल्य ४६ लाख ७६ हजार इतके होते. आता गडकरी दांपत्याकडे सहा वाहने असून त्यांचे मूल्य ४५ लाख ९४ हजार इतके आहे. २०१९ ते २०२४ या कालावधीत त्यांनी दोन कार खरेदी केल्या.

# ट्रेडिंगच्या नादात महिलेसह तिघांची ७१ लाखांची फसवणूक

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : शेअर मार्केट ट्रेडिंगच्या नादात तिघांना फसविल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी बुधवारी (दि. २७) वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

पहिल्या घटनेमध्ये आनंदनगर भागात राहणाऱ्या अमित जितेंद्र शाह (वय ४५) यांनी सिंहगड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना २२ नोव्हेंबर ते ३० जानेवारी २०२४ या दरम्यान घडली आहे. फिर्यादी यांना सायबर चोरट्याने शेअर मार्केटिंग शिकण्याच्या बहाण्याने व्हॉट्सप ग्रुपमध्ये ड केले. त्यामध्ये दररोज शेअर मार्केटविषयी ट्रेनिंग दिली जात होती. गुंतवणूक केल्यास चांगला परतावा मिळतो असे भासविले जात होते. गुंतवणुकीचे आमिष दाखवून त्यांना ट्रेडिंगसाठी प डाऊनलोड करायला लावले. यात फिर्यादी यांनी तब्बल ६१ लाख रुपयांची गुंतवणूक केली. यानंतर त्यांच्या पवर शेअर ट्रेडिंगमधून फायदा झाल्याचे दिसून येत होते. मात्र, फिर्यादी यांना ते पैसे काढता येत नव्हते. यावेळी त्यांनी सायबर चोरट्यांशी संपर्क केला तेव्हा वेळोवेळी आणखी पैसे भरण्यासाठी तगादा लावला जात होता. पैसे मिळणार नाहीत, याची खात्री झाल्यावर सिंहगड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दुसऱ्या प्रकरणामध्ये, मगरपट्टा सिटी परिसरात राहणाऱ्या बालाउपेंद्र हरिप्रसाद कुकलाकुंट (४४) यांनी हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार १२ फेब्रुवारी २०२४ ते २२ फेब्रुवारी २०२४ या दरम्यानच्या काळात शेअर ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतविले तर नफा मिळवून देतो असे प्रलोभन दाखवून त्यांना ७ लाख ५८ हजार रुपये भरण्यास भाग पाडले. मात्र, कोणताही नफा न देता त्यांची फसवणूक केली आहे.

तिसऱ्या घटनेत कोथरूड परिसरात राहणाऱ्या ४२ वर्षीय महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, कृष्णन कुमार अशी ओळख सांगून शेअर ट्रेडिंगमध्ये अकाउंट ओपन करून जास्तीचा परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून २ लाख ६९ हजार रुपये भरण्यास भाग पाडले. मात्र, परतावा न देता तक्रारदार महिलेने फसवणूक केल्याचे लक्षात येताच पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार नोंदविली आहे.

# लाच घेणाऱ्या ग्रामसेवकाच्या आवळल्या मुसक्या

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : घराच्या उताऱ्यात दुरुस्ती करुन देण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच घेताना वरसगावच्या ग्रामसेवकाला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. विठ्ठल वामन घाडगे (वय ४४, रा. वरसगाव, वेल्हा) असे या ग्रामसेवकाचे नाव आहे.

तक्रारदार यांचे वरसगाव येथे वडिलोपार्जित घर आहे. या मिळकतीच्या क्षेत्राच्या नोंदीत दुरुस्त करुन घराच्या ८ उताऱ्यावर तक्रारदार यांचे नाव दुरुस्ती व त्यांच्या आईचे नाव लावण्यासाठी ग्रामपंचायतीत अर्ज केला होता. ग्रामसेवक विठ्ठल घाडगे याने त्यांच्याकडे ५ हजारांची लाच मागितली. त्याची लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली.

या तक्रारीची पडताळणी बुधवारी करण्यात आली. कर्वेनगर येथील मातोश्री वृद्धाश्रमाचे जवळ घाडगे याने बोलावले. तक्रारदाराकडून ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने घाडगे याला पकडले. वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस निरीक्षक विद्युलता चव्हाण तपास करीत आहेत.

# कळंबा तलावातील पाणीसाठ्याने तळ गाठला

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कळंबा : यंदा प्रथमच मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात अर्थात उन्हाळ्याच्या सुरुवातीला कळंबा तलावातील पाणीसाठ्याने तळ गाठला आहे. तलाव पात्रातील ऐतिहासिक शाहू कालीन विहीर उडली पडायला सुरुवात झाली आहे. या शाहू कालीन विहिरीला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

कळंबा तलाव प्रदूषित होऊ नये म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी तलावानजीकची बालिंगा व कळंबा गावे तलाव पात्रापासून दूर वसवली. शिवाय संपूर्ण तलाव कोरडा पडला तरी ग्रामस्थांचे आणि मूक जनावरांचे पाण्याविना हाल होऊ नये म्हणून तलाव पात्रात भव्य विहीरीची उभारणी केली होती. आजमितीला कळंबा तलावात निव्वळ आठ फूट पाणीसाठा शिल्लक असून जलचरांच्या अस्तित्वासाठी हा पाणीसाठा पावसाळ्याच्या सुरवातीपर्यंत ठेवणे प्रशासनास क्रमप्राप्तच आहे. पावसाळ्यास अद्यापही अडीच महिन्याचा कालावधी आहे. वाढत्या उष्णतेमुळे पाण्याचे बाष्पीभवन वेगात होत असून डेड वॉटर शिल्लक राहिले तरी पाणीउपसा बंद करण्यात आला नसल्याने २०१६ नंतर पुन्हा यंदा तलाव कोरडा ठणठणीत पडणार हे निश्चित. त्यामुळे कळंबा ग्रामपंचायतीपुढे जैवविविधता कायम राखत पाणीप्रश्नाची भीषणता कमी करण्याचे मोठे आव्हान आहे. गेल्या साठ वर्षात यशवंतग्राम निर्मलग्राम पुरस्कार विजेत्या कळंबा ग्रामपंचायतीला ग्रामस्थांसाठी स्वतःची पाणीपुरवठा योजना उभारता आली नाही. शिवाय पालिका मालिकीच्या तलावाचे पाणी ग्रामपंचायतिला हवे पण सत्तर लाखांची पाणीपट्टी भरण्याच्या प्रश्नी हात वर. तलावाच्या पाणलोट क्षेत्रात बिल्डर लॉबीने धुमाकूळ घातला असून त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणे सुरू झाले आहे. तर पालिका मालकीच्या तलावावर एकही कर्मचारी नियुक्त करण्यात आला नसल्याने तलावाची गटारगंगा होत आहे.

# सांगली लोकसभा जनता दल स्वबळावर लढणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : आगामी सांगली लोकसभा निवडणुक जनता दल स्वबळावर लढविणार असून त्या पार्श्वभूमीवर उमेदवाराची चाचपणी सुरु आहे. तसेच जर अन्य पक्षाकडून सन्मानपूर्वक पाठिंब्याचा प्रस्ताव आल्यास त्याचाही विचार केला जाईल असा निर्णय यावेळी सांगली जिल्हा कार्यकारिणी बैठकीमध्ये घेण्यात आला. यावेळी बोलताना महाराष्ट्र प्रदेश सचिव श्री प्रेमचंद पांड्याजी म्हणाले की,जनता दल येणारी लोकसभा स्वबळावर लढवेल असे सांगून जर एखाद्या जिल्हा कार्यकारिणीचा निर्णय पक्षाने सन्मानजनक पाठिंबा मागितल्यास त्याचाही आपला पक्ष विचार करेल असे श्री प्रेमचंद पांड्याजी यांनी सांगितले.यावेळी युवा प्रदेशाध्यक्ष श्री सुमित पाटील म्हणाले की आपले नेते दिवंगत माजी आमदार प्रा. शरद पाटील यांनी आपल्याला एक विचाराचा वारसा देऊन गेलेत आहेत. त्याच मार्गाने आपण सर्वांनी वाटचाल करावी.जिल्हा उपाध्यक्ष डॉ. जयपाल चौगुले म्हणाले की, महाराष्ट्र प्रदेश जनता दलाचे माजी प्रदेशाध्यक्ष व माजी आमदार दिवंगत प्रा. शरद पाटील यांनी अनेक प्रलोभने येऊनदेखील अंतिम क्षणापर्यंत आपल्या विचाराशी कधीही तडजोड केली नाही.त्याच विचाराने आपल्या पक्षाची पुढील वाटचाल करावी असे आवाहन यावेळी डॉ जयपाल चौगुले यांनी केले.

मनपा क्षेत्र अध्यक्ष श्री शशिकांत गायकवाड म्हणाले की कार्यकर्त्यांनी येणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये आपली ताकद दाखवून द्यावी म्हणजे आगामी विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकी मध्ये इतर पक्षांना आपली दखल घ्यावी लागेल.पश्चिम महाराष्ट्र जनता दलाचे ॲड. फैयाज झारी म्हणाले की, प्रा. शरद पाटील सरांचे कार्य पुढे चालू ठेऊन कार्यकर्त्यांनी त्याच्या विचारानेच पुढची राजकीय व सामाजिक वाटचाल करावी. यावेळी प्रामुख्याने सर्वश्री ॲड.शब्बीर आलासे, जनार्धन गोंधळी,संजय ऐनापुरे,प्रणव पाटील,संजय संकुन्हाट्टे, निहाल मणेर, तानाजी सरोदे, साहेबुद्दीन मुजावर,इकबाल बारगीर, राजू वड्याप्पन, यांच्यासह आदी मान्यवरानी लोकसभा निवडणुकीमध्ये आपल्या पक्षाची ताकद दाखवून देण्याचे आवाहन केले.

यावेळी प्रामुख्याने प्रा. महावीर पाचोरे, विशाल कांबळे, जमीर शरीकमसलत, तानाजी सरोदे, प्रवीण देवरुखकर, बाबासाहेब चिंचवाडे,यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.शेवटी युवा जनता दलाचे राहील मुल्ला यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मत्तीवडे येथे जलजीवन मिशन योजनेचे तीनतेरा

## ग्रामस्थांतून संताप, आप्पाचीवाडी ग्रामपंचायतीला निवेदन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोगनोळी : आप्पाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट असलेल्या मत्तीवडे (ता. निपाणी) येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाईपलाईन कामासाठी गावातील संपूर्ण रस्ते खोदले आहेत. त्याची अद्याप दुरुस्ती झालेली नाही. पाईपलाईन कामाच्या निकृष्ट दर्जाबाबत ग्रामस्थांनी निवेदनही दिले होते. आजतागायत कामाचे कोणतेही नियोजन झाले नाही. गावातील काही गल्लीमध्ये पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे.

पण कोणत्याही गल्लीला व्यवस्थित पाणीपुरवठा होत नाही. कामाचा दर्जाही निकृष्ट आहे. वेळोवेळी ग्रामस्थांनी संबंधित ठेकेदाराला यासंबंधीच्या सूचना केल्या आहेत. तरीही त्याकडे दुर्लक्ष झाले आहे. संबंधित ठेकेदाराच्या कामाबाबत असलेले बिल थांबविण्यात यावे व खोदलेले रस्ते पूर्ववत दुरुस्त करुन मिळावेत. पाणी व्यवस्थापन सुरळीत व्हावे अशा मागणीचे निवेदन आप्पाचीवाडी ग्रुप ग्रामपंचायतीचे अध्यक्ष, पंचायत विकास अधिकारी, सचिव यांना देण्यात आले आहे. संबंधित ठेकेदाराचे काम पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रकारे बिल देऊ नये अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

निवेदनवर तानाजी वाळके, शरद भोसले, प्रविण पाटील, रावसाहेब सुतार, गणेश पाटील, निलेश मळगे, सदाशिव पाटील, सोपान साठे, आण्णासो पाटील, राजाराम खाडे, रावसाहेब पाटील, संभाजी वाळके, सिताराम खाडे, शिवाजी जाधव, नामदेव शिंदे, तात्यासो पाटील यांच्यासह अन्य ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

# महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसुळ आणि उपआयुक्त शिल्पा दरेकर यांनी पदभार स्वीकारला



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : सांगली मिरज आणि कुपवाड महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त पदी नियुक्ती झाल्यानंतर नूतन अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसुळ आणि उपआयुक्त शिल्पा दरेकर यांनी पदभार स्वीकारला. तत्पूर्वी दोघाही अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी तथा प्रभारी आयुक्त डॉ. राजा दयानिधी यांची भेट घेतली. त्यानंतर अधिकाऱ्यांनी महापालिकेत येऊन आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला. नूतन अधिकाऱ्यांचे स्वागत उपायुक्त वैभव साबळे, नगरसचिव चंद्रकांत आडके आणि सहायक आयुक्त सहदेव कावडे यांनी केले.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयुक्त सुनील पवार , उपायुक्त राहुल रोकडे, पंडित पाटील आणि स्मृती पाटील यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. या मुळे रिक्त झालेल्या जागांवर निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार मंगळवार २६ मार्च २०२४ रोजी कोल्हापूर मनपाचे अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसुळ यांची सांगली मिरज कुपवाड महापालिकेकडे अतिरिक्त आयुक्त म्हणून आणि कोल्हापूर मनपाच्या उपआयुक्त शिल्पा दरेकर यांची उपायुक्त म्हणून नियुक्ती झाली. आज नूतन अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ आणि उपआयुक्त शिल्पा दरेकर यांनी जिल्हाधिकारी तथा प्रभारी आयुक्त डॉ. राजा दयानिधी यांची भेट घेतली. यावेळी उपायुक्त वैभव साबळे उपस्थित होते. यानंतर नवनियुक्त अधिकाऱ्यांनी महापालिका मुख्यालयात येऊन आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला.

# राज्य मॉडेल स्कूल लंगरपेठ येथे शिक्षण परिषद उत्साहात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सांगलीने आयोजित केलेले केंद्रस्तरीय गटसंमेलन राज्य मॉडेल स्कूल लंगरपेठ या ठिकाणी नुकतेच पार पडले. आगळगावचे केंद्रप्रमुख श्री. उमराव रास्ते यांच्या देखरेखेखाली संमेलन पार पडले. याप्रसंगी नुतन केंद्रप्रमुख श्री. उमराव रास्ते साहेब यांचा स्वागतपर सत्कार शाळा व्यवस्थापन समिती व राज्य मॉडेल स्कूल लंगरपेठच्या वतीने वरिष्ठ मुख्याध्यापक श्री.उन्मेष शेटे यांनी केला.





तसेच विश्वनाथ शेळके वरिष्ठ मुख्याध्यापक यांचाही सत्कार करण्यात आला. प्रस्तावना करून प्रशिक्षणाची सुरुवात केली. यावेळी नॅशनल अचिव्हमेंट सर्वेबद्दलच्या पूर्वतयारी विषयी श्री. रमेश झिटे, पायाभूत चाचणी( झ-ढ) संदर्भात श्री. ओंकार कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

हायस्कूलसहित सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. दरम्यान, राज्य मॉडेल स्कूल लंगरपेठ मधील भौतिक सुविधा, रंगरंगोटी, चिल्ड्रन पार्क, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आयुर्वेदिक गार्डन, सेल्फी पॉईंट, शाळेपुढील लॉन्स, प्लॅस्टिक कचरा संकलन, कचरापेटी, अद्ययावत शौचालय, पोषण आहारातील शिल्लक अन्नाचे नियोजन, परसबाग, सुशोभित बाग, बाला पेंटीग अंतर्गत शालेय सुशोभीकरण व रंगरंगोटी, शाळेबाहेरची व अंतर्गत झाडे आदिंची पूर्तता केली आहे.

याविषयी राज्य मॉडेल स्कूलचे मुख्याध्यापक, स्कूल कमिटीचे अध्यक्ष डॉ. रविंद्र सुर्यवशी व शिक्षक वृंदाचे सत्कार करून अभिनंदनीय कौतुक करण्यात आले. एकंदरीत शिक्षण परिषदेची शैक्षणिक सत्रातील अंतिम सहविचार सभा ही उत्साहात पार पडली. आभार प्रदर्शन श्री.अनिल हंकारे यांनी केले.

# वंचित वडार समाजाला अखेर म्हैसाळचे पाणी मिळाले

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

बेडग : खटावमधील वडार समाज गेले तीन वर्षापासून पिण्याच्या पाण्यापासून वंचित असलेल्या शूरवीर हरबा वडार फाऊंडेशनच्या सहकार्याने आंदोलन केल्याने म्हैसाळ योजनेची पाणी सोडल्याने अखेर न्याय मिळाला . खटाव ( ता . मिरज ) हे गाव सांगली जिल्ह्यातील शेवटचे गाव आहे . या गावात साधारणपणें वडार समाजाची १५० एवढी लोकसंख्या आहे परंतु गावात पाण्याची खुप टंचाई असल्यामुळे पिण्यास सुध्दा पाणी मिळत नाही . त्यामुळे समाजातील महिला एक घागर पाणी आणण्यासाठी एक किलोमीटर अंतरावर जातात तेही पाणी चांगले नसते एवढा पाण्यासाठी महिलांचे हाल होत असताना राजकीय लोकांची कसलीही मदत होत नाही . उलट समाजाची कुचेष्टा करतात परंतु



पिण्यासाठी पाणी तीन वर्ष दिले नव्हते . त्यामुळे वडार समाजाला शशिकांत दादा वाटेगावकर साहेब यांची आठवण झाली . लगेच वडार समाजाच्या अनेक तरुणानी शशिकांत दादांना सर्व कल्पना दिले .

दादांनी ताबडतोब मिरज म्हैसाळ जलसंपदाचे अभियंता व मुख्य अभियंता ऐनापुरे व कर्नाळे साहेब यांना वडार समाजाला तीन दिवसांत भरपूर पाणी सोडण्याचे निवेदन दिले . पाणी नाही सोडल्यास मी व माझे सहकारी पदाधिकारी यांना घेऊन सांगली वारणाली कार्यालयात समोर तीव्र असे आंदोलन करणार असे सांगितले होते . त्यावेळी मंगळवारी नक्की पाणी सोडतो असे जलसंपदा विभागाने आश्वासन दिले होते . पण त्यांनी पाणी सोडले नाही . त्यामुळे मंगळवारी मिरज येथे आंदोलन करावे लागले . राजकीय दबाव असल्यामुळे पाणी सोडले नाही म्हणून शशिकांत वाटेगावकर साहेबांनी व सरस्वती ताई चौगुले (महिला अध्यक्ष शिवसेना शिंदे गट ) आणि संजय वडार ,नारायण वडार सुधीर वडार , मनोज वडार रमेश वडार, अशोक वडर महादेव मिरजे, शिवा मिरजे , असे अनेक कार्यकर्ते मिळून खूप तीव्र आंदोलन केले . यावेळी पाणी घेतल्या शिवाय तुमचे कार्यालय बंद करु देणार नाही व तुम्हाला बाहेर ही सोडणार नाही असा दादांनी दम दिला व ताईंनी एक तासाची फक्त वेळ व मुदत दिली हे ऐकून ताबडतोब वडार समाजातील बंधारा व एक विहीर भरण्यासाठी पाणी सोडण्यात आले . ही आंदोलनाची ताकद पाहून सर्व वडार समाजाला धक्का बसला कारण तीन वर्ष आम्ही खूप प्रयत्न केला पण आमची दाद घेतली नव्हती . आज शशिकांत दादांच्या प्रयत्नामुळे पाणी मिळाले असे वडार समाजाकडून सांगण्यात आले . महिलांची उन्हात वन वन भटकंती थांबली . खटावच्या वडार समाजाच्या वतीने शशिकांत दादांना व सरस्वती ताईंना मनापासुन जाहीर आभार मानले.

# प्रा. विश्वनाथ व्हनमोरे यांची लोकसेवा आयोगामार्फत दुय्यम निबंधक श्रेणी - १ व राज्य कर निरीक्षक या दोन पदांवर निवड

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मिरज : मिरजेतील कन्या महाविद्यालयात इंग्रजी विभागाकडे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असणारे विश्वनाथ भाऊसाहेब व्हनमोरे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांमधून दुय्यम निबंधक श्रेणी -१ तसेच राज्य कर निरीक्षक या दोन पदांसाठी निवड झाली. कवठेमहांकाळ तालुक्यातील हिंगणगाव या गावचे सुपुत्र असलेले विश्वनाथ व्हनमोरे यांनी एस. के. पाटील महाविद्यालय, कुरुंदवाड येथून पदवी तर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून इंग्रजी विषयातून पदव्युत्तर शिक्षण



पूर्ण केले. अध्यापनाची आवड असल्याने ते नेट, सेट व के सेट या पात्रता परीक्षादेखील उत्तीर्ण झाले. गेली सहा वर्षे ते मिरजेतील कन्या महाविद्यालयात वरिष्ठ विभागाकडे इंग्रजी विषयासाठी सी. एच. बी. तत्वावर सहाय्यक प्राध्यापक म्हणून काम करत आहेत. अध्यापनासोबतच प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षांचा अभ्यास सुरू केला. जिद्द, चिकाटी व कठोर अभ्यास या त्रिसूत्रीचा अवलंब करून त्यांनी लागोपाठ दोन पदांना गवसणी घालत यश प्राप्त केले.त्यांना नालंदा अॅकॅडमी, सांगलीचे संस्थापक अनिकेत साळुंखे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशात त्यांचे वडील भाऊसाहेब, आई मंगल व बहीण डॉ. अश्विनी यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी संपादन केलेल्या या दैदीप्यमान यशाबद्दल दि न्यू मिरज एज्युकेशन सोसायटीचे सचिव राजू झाडबुके, संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास माळकर, उपप्राचार्या डॉ. सुनिता माळी, पर्यवेक्षिका प्रा. नलिनी प्रज्ञासूर्य, इंग्रजी विभागप्रमुख डॉ. माधुरी देशमुख, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभिनंदन केले व त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.